आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.१९

# कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या एन.एम.एम.एस परीक्षेतील यशामध्ये शालेय नेतृत्वाची भूमिका

# The Role Of School Leadership in Students Success in N.M.M.S. Examination in Kolhapur District

**प्रस्तावना –**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यासाठी शिष्यवृती योजना परीक्षा (NMMS) ही केंद्रशासन पुरूस्कृत योजना असुन 2007 / 2008 पासुन सुरू झाली आहे. भारत सरकारच्या मानव संशोधन विकास मंत्रालयाच्यावतीने NCERT मार्फत संपूर्ण देशातील सर्व राज्य /केंद्रशासित प्रदेशामध्ये ही परीक्षा आयोजित केली जाते.महाराष्ट्र राज्यासाठी ही परीक्षा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत सर्व जिल्हयातील विविध केंद्रावर आयोजित केली जाते. इयत्ता ८ वी मधील आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेवुन त्यांना सर्वोत्तम शिक्षण देण्याच्या दृष्टीने आर्थिक साहाय्य करणे तसेच या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक स्तरापर्यतचे शिक्षण घेण्यास मदत करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. आर्थिक दुर्बलतेमुळे प्रज्ञावान विद्यार्थ्यांची उच्च माध्यमिक स्तरापर्यंत होणारी गळती रोखणे हा ही योजनेचा महत्वाचा उद्देश आहे.

अखिल भारतीय पातळीवर एन.एम.एम.एस.शिष्यवृतीचा कोटा एक लाख इतका आहे. महाराष्ट्रासाठी ११६८२ इतका कोटा निश्चित करून दिलेला आहे. कोल्हापूर जिल्हयासाठी हा कोटा ४४८ इतका निश्चित केला आहे. महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर जिल्हयाचे एन.एम.एम.एस.परीक्षेतील यश हे उल्लेखनिय आहे

मागील कांही वर्षात कोल्हापूर जिल्हयातील विद्यार्थ्यांचे एन.एम.एम.एस.परीक्षेतील यश फारसे समाधानकारक नव्हते. त्यामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी होत्या. दैनंदिन कामकाज करून एन.एम.एम.एस. परीक्षेकरीता मुलांची तयारी करून घेण्यासाठी म्हणजेच अतिरिक्त कामकाज करण्यास शिक्षक फारसे उत्सुक नव्हते. विद्यार्थ्यांचा एन.एम.एम.एस.परीक्षेकडे बघण्याचा दृष्टीकोन समाधानकारक नव्हता. पालकवर्ग मोठया प्रमाणात शेतकरी व शेतमजूर वर्गातील असल्यामुळे शिक्षणाचे महत्व त्यांना फारसे माहीत नव्हते. घरामध्ये मुलांना अध्ययनपूरक वातावरण तयार करून देणे, शाळेच्या संपर्कात राहून पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी दर्जेदार वेळ देणे याबद्दल त्यांच्याकडून योग्य तो प्रतिसाद मिळत नव्हता. थोडक्यात पालकांकडून सुजाण पालकत्वाची भूमिका पार पाडली जात नव्हती.

वरील सर्व अडचणींचे निराकरण करण्यासाठी शालेय नेतृत्वाने योग्य ती पाऊले ऊचलणे आवश्यक आहे. त्यासाठी मुख्याध्यापकांकडे २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठीची आवश्यक कौशल्य असणे गरजेचे होते. शाळा स्तरावर मुख्याध्यापकांकडून योग्य पध्दतीने शाळेचे संचालन करण्यामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी येत होत्या. यावर उपाययोजना करण्याच्या उद्देशाने आम्ही जवळच्या शाळांमधील मुख्याध्यापकांचा अनौपचारीक पातळीवर एक व्यावसायीक अध्ययन समुह (Professional Learning Community) तयार केला. या समुहामध्ये आम्ही १५ दिवसातून एकदा एकत्र जमत असू. मी शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये राज्यस्तरीय साधनव्यक्ती म्हणून काम केले असल्यामुळे या गटातील मुख्याध्यापकांना नेतृत्वाच्या विविध नवनविन संकल्पना सांगून नेतृत्व विकसित करण्याचे प्रयत्न केले. गेल्या कांही वर्षामध्ये एन.एम.एम.एस.परीक्षेत कोल्हापूर जिल्हयाचा निकाल फारसा समाधान कारक नव्हता. म्हणून आम्ही विशेष म्हणजे एन.एम.एम.एस.परीक्षेमध्ये उज्वल यश मिळविण्याच्या दृष्टीने कायकाय करता येईल? याचा प्राधान्याने विचार केला. आमच्या चर्चासत्रामध्ये प्रत्येकाला आपली मते मांडण्यास सांगितले जाते. अशा प्रकारच्या अनेक चर्चामधून आम्ही एन.एम.एम.एस.परीक्षेसाठी आमचा स्वतःचा एक कृती आराखडा तयार केला. या कृती आराखडयानुसार त्यामध्ये प्रत्येकाने आपल्या शाळांमध्ये काम करण्याचे ठरले. त्यानुसार प्रत्येक मुख्याध्यापकांना नविन दृष्टीकोनातून आपआपल्या शाळास्तरावर प्राप्त संसाधनांचा उच्चतम वापर करून एन.एम.एम.एस.परीक्षेमध्ये यश मिळविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. या सर्व प्रयत्नांचा विविध शाळांना खूप चांगला फायदा झाला. एन.एम.एम.एस. परीक्षेमध्ये यातील अनेक शाळांनी उज्वल यश मिळविले. कोल्हापूर जिल्हयातील एन.एम.एम.एस. परीक्षेमध्ये पहिल्या तीन क्रमांकामध्ये यातील शाळांचा समावेश झाला. या शाळांच्या यशोगाथांचा अभ्यास करून शिक्षक व मुख्याध्यापकांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने हे मोडयूल तयार करण्याात आले आहे.

**मोडयुल अध्ययनाची उद्दीष्टे :-**

१) एन.एम.एम.एस. परीक्षेचा अभ्यासक्रम व आयोजन याबाबत माहिती समजुन घेणे.

२) एन.एम.एम.एस. परीक्षेमध्ये यशस्वी ठरलेल्या शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे.

३) एन.एम.एम.एस.परीक्षेमध्ये यश मिळविण्यासाठी शालेय नेतृत्वाने या संदर्भात येणा-या विविध आव्हानांवर यशस्वीपणे कशी मात केली याचा अभ्यास करणे.

४) एन.एम.एम.एस. परीक्षेमध्ये यश संपादन करण्यासाठी शालेय नेतृत्वाचा दृष्टीकोन विकसित होण्यास मदत करणे.

**एन.एम.एम.एस.परीक्षा माहिती :-**

१. **योजनेचे उद्दिष्ट** :- इयत्ता ८ वी अखेर आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन बुध्दिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिक साहय करावे त्यानुसार विद्यार्थ्यांचे उच्च माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण घेण्यास मदत व्हावी आर्थिक दुर्बलतेमुळे प्रज्ञावान विद्यार्थ्यांची उच्च माध्यमिक स्तरापर्यंत होणारी गळती रोखावी या योजनेचा हेतू आहे.

२. **परीक्षेचे स्वरूप** :- केंद्रशासनामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली (एन.सी.इ.आर.टी.) यांनी २००७ - ०८ पासून आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यासाठी सदरची परिक्षा इ.८ वी साठी सुरू केली आहे. महाराष्ट्र राज्यासाठी ही परिक्षा महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे

यांच्यामार्फत जिल्हयातील विविध केंद्रावर घेतली जाते. शिष्यवृती पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यास दरमहा रू.१००० /-(वार्षिक रू.१२००० /-) शिष्यवृती दिली जाते.

३.पात्रता ः-

a) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासकीय शासनमान्य अनुदानित स्थानिक स्वराज्य संस्थेतील इ.८ वी मध्ये शिकत असलेल्या आणि खालील अटी पूर्ण करणा-या नियमित विद्यार्थी- विद्यार्थीनि यांना परीक्षेस बसता येते.

b) पालकांचे (आई व वडील दोघांचे मिळुन)वार्षिक उत्पन्न रू.१,५०,०००/- पेक्षा कमी असावे.

c) विद्यार्थी /विद्यार्थीनी इयत्ता ७वी मध्ये ५५% गुण मिळवुन उतीर्ण झालेला असावा. (SC/ST) चा विद्यार्थी किमान ५०% गुण मिळवुन उतीर्ण झालेला असावा.

d) खालील विद्याथी एन.एम.एम.एस.परीक्षेसाठी अपात्र आहे.

विनाअनुदानीत शाळेत शिकणारे विद्याथी, केंद्रीय विद्यालयात शिकणारे विद्यार्थी, जवाहर नवोदय विद्यालयात शिकणारे विद्यार्थी, शासकिय वस्तीगृहाच्या सवलतीचा, भोजनव्यवस्थेचा व शैक्षणिक सुविधांचा लाभ घेणारे विद्यार्थी, सैनिकी शाळेमध्ये शिकणारे विद्यार्थी.

४.**परीक्षेसाठी विषय** ः- सदर परीक्षेसाठी २ विषय असतील

a) **बौध्दिक क्षमता चाचणी (MAT)** ः- ही मानसशास्त्रीय चाचणी असून त्यामध्ये कार्यकारणभाव विश्लेषण, संकलन इत्यादी संकल्पनावर आधारीत ९० बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतात.

b) **शालेय क्षमता चाचणी (SAT)** ः- ही सामान्यतः इयत्ता ७ वी व ८वीच्या अभ्यासक्रमावर आधारित असून त्यामध्ये १.सामान्यविज्ञान एकुण (गुण -३५) २.समाजशास्त्र (गुण -३५) ३.गणित(गुण -२०) असे ३ विषय असतील.या ३ विषयाचे एकुण ९० प्रश्न सोडवायचे असतात.

५. **माध्यम** ः- प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, उर्दु, सिंधी, कन्नड व तेलगु या आठ माध्यमातून उपलव्ध असतील (सर्व विद्यार्थ्यांना मूळ माध्यमावरोबर इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका एकत्र येणार आहे) यापैकी कोणतेही एकच माध्यम घेता येते.

६. **परीक्षेचे मुल्यमापन** ः- विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिकांची तपासणी संगणकामार्फत OMR पध्दतीने करण्यात येते.

७. **आरक्षण व शिष्यवृती संख्या** ः-अखिल भारतीय पातळीवर एन.एम.एम.एस. शिष्यवृती संख्या एक लाख इतकी आहे.महाराष्ट्रासाठी ११६८२ इतका कोटा निश्चित करून दिलेला आहे.कोटयानुसार व राज्याच्या संवर्गनिहाय आरक्षणानुसार गुणवत्तेच्या आधारे जिल्हानिहाय, संवर्गनिहाय विद्यार्थ्यांची शिष्यवृतीसाठी निवड केली जाते.

८. **शिष्यवृती दर** ः-शिष्यवृतीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यास इयत्ता ९वी ते १२वी पर्यंत दरमहा रूपये १०००/- (वार्षिक रू.१२०००/-) शिष्यवृती दिली जाते.

• शिष्यवृती पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृती मिळण्यासाठी इयत्ता ९ वी व ११ वी मध्ये किमान ५५% गुण मिळणे आवश्यक आहे. (SC/ST) विद्यार्थ्यांना किमान ५५% गुणंची आवश्यकता आहे. इयत्ता १० वी

मध्ये किमान ६0% गुण मिळणे आवश्यक आहे. (SC/ST) विद्यार्थ्यांना किमान ५५% गुणांची आवश्यकता आहे.

**छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) योजना ः-**

छत्रपती शाहु महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी पुणे यांचे मार्फत मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या लक्षित गटातील विद्यार्थ्यांना सन २0२१/२२ या शैक्षणिक वर्षापासून छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) योजना सुरू करण्यात आली आहे. सन २0२१/२२ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्रातील १११८६ विद्यार्थ्यांना सदरची शिष्यवृती दिली जाणार आहे. या शिष्यवृतीचे हे पहिलेच वर्षे आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे मार्फत दरवर्षी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृती योजना परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा उतीर्ण झालेले पण केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृतीचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसलेल्या इ. ९ वी ते इ.१२ वी पर्यंतच्या लक्षित गटातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या संवर्गाच्या विद्यार्थ्यांना सारथी मार्फत छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस) दिली जाणार आहे. लक्षित गटातील ज्या पालकांचे वार्षिक उत्पंन्न रू.१५0000/- च्या आत आहे अशा आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यास कुटूंबाचा वार्षिक उत्पंनाचा दाखला सादर करून या शिष्यवृतीचा लाभ घेता येतो. इ.९ वी पासून दरवर्षी रू.९६00/- प्रमाणे इ.१२ वी पर्यत चार वर्ष सलग ही शिष्यवृती अदा केली जाणार आहे. या वर्षी शिष्यवृतीची रक्कम या शिष्यवृतीस पात्र असणा-या विद्यार्थ्यांच्या थेट बॅंक खात्यात सारथी संस्थेमार्फत अदा करण्यात आली आहे.

**एन.एम.एम.एस. परीक्षेमध्ये यश मिळविण्यामध्ये शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने ः-**

एन.एम.एम.एस.परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या शेक्षणिक विकासाच्या व आर्थिक मदत होण्याच्या दृष्टीने अंत्यत महत्वाची परीक्षा आहे. या परीक्षेत यश संपादन करण्यासाठी शालेय नेतृत्वाला विद्यार्थी, पालक, शिक्षक इत्यादी घटकाशी सातत्याने आंतरक्रिया करावी लागते. ब-याचदा या विविध घटकाशी होत असलेली आंतरक्रिया यशस्वी होत नाही. त्यामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. ज्या शाळानी एन.एम.एम.एस. परीक्षेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे त्यांनाही विविध आव्हानाना/ समस्याना सामोरे जावे लागले.एन.एम.एम.एस.परीक्षेमध्ये यश मिळविण्यामध्ये शालेय नेतृत्वासमोर येणारी आव्हाने खालील प्रकारे आहेत.

**१) विद्यार्थ्यासंबधित आव्हाने / समस्या ः-**

- दैनंदिन उपस्थितीतील सातत्याचा अभाव.
- कुट प्रश्न सोडविण्यात येणा-या अडचणी.
- विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक समस्या.
- पायाभुत संकल्पना व संबोध स्पष्ट नसणे.
- एन.एम.एम.एस. परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृती परीक्षा या दोन्ही परीक्षा एकाच वर्षात येतात त्यामुळे विद्यार्थ्यांच्यावर अतिरिक्त ताण येतो.
- उपयोजनात्मक प्रश्ननिर्मिती करण्यामध्ये विद्यार्थ्याना अडचणी येतात.

२) **पालकाशी संबधित आव्हाने / समस्या ः–**

- कांही पालक आपल्या पाल्याना ॲन्ड्रॉईड मोबाईल उपलब्ध करून देऊ शकत नाहीत.
- पालक आपल्या घरात पाल्याना अभ्यासपुरक वातावरण निर्मिती करून देऊ शकत नाहीत.
- एन.एम.एम.एस.परीक्षा आवेदन पत्रे भरण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पालकांच्या कडुन वेळेत पुर्तता होत नाही.
- बरेचदा पालकांना परीक्षे बाबत अद्ययावत ज्ञान नाही.
- पाल्याच्या शैक्षणिक विकासामध्ये पालकांचे अत्यल्प योगदान.

३) **शिक्षकाशी संबधित आव्हाने / समस्या ः–**

- एकाच शिक्षकाकडे विविध स्पर्धा परीक्षांची जबाबदारी असल्यामुळे त्यांच्यावर अध्यापनाचा अतिरिक्त ताण येतो.
- सुट्टीच्या कालावधीत मार्गदर्शन वर्गासाठी उपस्थित राहण्याबाबत शिक्षकांची नकारात्मक मानसिकता.

४) **इतर आव्हाने / समस्या ः–**

- ऑनलाईन अध्यापन करताना मोबाईल रेंजचा अभाव
- आवेदन पत्रासाठी आवश्यक दाखले, बॅक खाते इत्यादी वेळेत मिळण्यामध्ये संबधित विभागाकडुन फारशे सहकार्य न मिळणे.

**कोल्हापूर जिल्हयाचे एन.एम.एम.एस परीक्षेतील यश ः–**

एन.एम.एम.एस परीक्षेचा महाराष्ट्रासाठी ११६८२ इतका कोटा निश्चित करून दिलेला आहे. कोल्हापूर जिल्हयासाठी हा कोटा ४४८ इतका निश्चित केला आहे. महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर जिल्हयाचे एन.एम.एम.एस.परीक्षेतील यश हे उल्लेखनिय आहे.

कोल्हापूर जिल्हयाची गेल्या तीन वर्षाची एन.एम.एम.एस.शिष्यवृती धारक संख्या खालील प्रमाणे आहे.

| शैक्षणिक वर्ष | शिष्यवृती धारक संख्या |
|---|---|
| २०१८/१९ | १३९३ |
| २०१९/२० | १४७९ |
| २०२०/२१ | १८८९ |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की जिल्हयाचा कोटा ४४८ असला तरी प्रत्यक्षात शिष्यवृती प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या त्यापेक्षा कितीतरी अधिक आहे. या अधिकच्या शिष्यवृत्या कोल्हापूर जिल्हयाने जास्तीत जास्त विद्यार्थी या परीक्षेला प्रविष्ठ करून व आपल्या गुणवत्तेच्या जोरावर इतर जिल्हयाकडून खेचून घेतलेल्या आहेत. प्रत्येक वर्षी जिल्हयाच्या शिष्यवृतीधारक संख्येमध्ये वाढ होताना दिसत आहे. यावरून असे म्हणता येईल की कोल्हापूर जिल्हयामध्ये एन.एम.एम.एस.परीक्षेच्या अनुषंगाने शाळांच्याकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. शाळांच्यामध्ये विधायक स्पर्धा दिसून येते. नियोजनबध्द पध्दतीने विद्यार्थ्यांची एन.एम.एम.एस.परीक्षेकरीता तयारी करून घेतली जाते. यात विद्यार्थ्यांचा एन.एम.एम.एस.परीक्षेतील यशामध्ये खुप मोलाचा वाटा आहे.

**कोल्हापूर जिल्हयाचे छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस) योजनेतील यश ः-**

सन २०२१/२२ या शैक्षणिक वर्षापासून छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) योजनेअतंर्गत महाराष्ट्रातील ११११८६ विद्यार्थ्यांना सदरची शिष्यवृती दिली जाणार आहे. या शिष्यवृतीचे हे पहिलेच वर्षे आहे.महाराष्ट्रातील सदरची शिष्यवृती मिळवणारे पहिले तीन जिल्हे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | एकूण अर्ज | पात्र अर्ज |
|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ४१४९ | २९२५ |
| २ | सातारा | १४४५ | १२०५ |
| ३ | अहमदनगर | ११७४ | ७३० |

वरील सारणीवरून असे दिसते की, कोल्हापूर जिल्हयाचे छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती ( एन.एम.एम.एस.) योजनेतील यश हे महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वाधिक आहे.

**एन.एन.एम.एस.परीक्षेत उज्चल यश मिळविलेल्या शालेय नेतृत्वाचा अभ्यास ः-**

एन.एन.एम.एस.परीक्षेत अधिकाधिक विद्यार्थी गुणवत्ताधारक व शिष्यवृतीधारक बनविणे हे आव्हानात्मक काम आहे. शालेय नेतृत्वाला या बाबतीत काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. जरी प्रतिकुल परिस्थिती असली तरी शालेय नेतृत्वाला आपल्या कल्पक नेतृत्वाचे आधारे उपलब्ध मानवी व भौतिक संसाधनांचा उच्चतम पध्दतीने वापर करून या अडचणीवर मात करणे अपेक्षित आहे. आज कोल्हापूर जिल्हयातील अनेक मुख्याध्यापक व शिक्षक यांनी एन.एन.एम.एस.परीक्षेमध्ये उज्चल यश मिळविण्यासाठी नियोजनबद्ध पध्दतीने कामकाज करून आपल्या शाळा यशोशिखरावर नेण्यात यशस्वी होताना दिसून येतात. कोल्हापूर जिल्हयातील एन.एन.एम.एस.परीक्षेमध्ये उत्कृष्ठ काम करणा-या शालेय नेतृत्वाच्या यशोगाथा आपण अभ्यासणार आहोत. एन.एन.एम.एस. परीक्षेमध्ये विद्यार्थी घडविताना येणा-या विविध अडचणीवर शालेय मुख्याध्यापकांनी आपल्या नेतृत्व कौशल्याच्याआधारे अडचणीवर मात करून केलेला प्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे. अशा शाळेच्या मुख्याध्यापकांच्या यशोगाथा मधून प्रेरणा घेऊन इतर शाळातील मुख्याध्यापकांनीही आपले नेतृत्व विकसित करून आपली शाळा प्रगतीपथावर घेऊन जाण्यासाठी कार्यप्रेरित व्हावे अशी अपेक्षा आहे.

**यशोगाथा**

**श्री.परशराम बाळाजी पाटील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय**

**मुदाळ ता.भुदरगड, जि. कोल्हापूर.**

**श्री.शहाजी मारूती पाटील**

श्री.परशराम बाळाजी पाटील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय मुदाळ ता.भुदरगड, जि. कोल्हापूर. ही शाळा जून १९९१ मध्ये सुरू झाली. श्री.शहाजी मारूती पाटील हे शाळेच्या स्थापनेपासूनच या शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. सुरुवातीस साध्या इमारतीत माध्यमिकचे वर्ग सुरू झाले. प्रत्येक वर्गात २०/२५ विद्यार्थी होते. पूर्वी शाळा विनाअनुदानित होती. अगदी अल्प पगारावर इ.५ वी ते इ.१० वी ला अध्यापन करणारे १० शिक्षक होते. विद्यार्थी विकासाचे विविध उपक्रम राबवुन श्री. पाटील सरांनी शाळा अगदी तालुक्यातच नव्हे तर

संपूर्ण जिल्हयामध्ये नावारूपाला आणलेली शाळा आहे. आज शाळेची स्वतःची सुसज्ज आर.सी.सी. इमारत असून प्रशस्त असे पटांगण आहे. सर्व शालेय तसेच सहशालेय उपक्रमांच्या प्रभावी अमलबजावणी बरोबरच शासनाच्या विविध स्पर्धामध्येही शाळेने उल्लेखनिय कामगिरी केली आहे. या विविध स्पर्धा परीक्षापैकी एन.एम.एम.एस.परीक्षेतील या शाळेचे यश हे फार उल्लेखनिय आहे. आजपर्यंत ७३३ विद्यार्थी एन.एम.एम.एस. परीक्षेत शिष्यवृती धारक झाले आहे.

**शाळेच्या एन.एम.एम.एस.परीक्षेतील ३ वर्षाचे यश**

| शैक्षणिक वर्ष | पट संख्या | एन.एम.एम.एस. परीक्षेस प्रविष्ठ संख्या | उतीर्ण संख्या | उतीर्णतेची टक्केवारी | एन.एम.एम.एस. शिष्यवृती धारक संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २०१८/१९ | २५८ | २०३ | १५५ | ७६.३५ | ६३ |
| २०१९/२० | २५७ | २०१ | १७३ | ८६.०६ | ७१ |
| २०२०/२१ | २४१ | १७६ | १७० | ९६.५९ | १५३ |




**एन.एम.एम.एस.परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी शाळेचे संचालक मंडळ व स्टाफ**



**सारथी पुणे या संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री.अशोक काकडे (IAS), शाळेचे संचालक, मुख्याध्यापक, व स्टाफ**



## ‘प. बा. पाटील’चा शिष्यवृत्ती पॅटर्न प्रेरणादायी

– शिक्षणधिकारी लोहार

कोल्हापूर : प्रतिनिधी

मुदाळच्या प. बा. पाटील संकुलात २०१२ पासून एनएमएमएस परीक्षेत एकूण ५८२ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. हा अव्वल शिष्यवृत्ती पॅटर्न राज्याला प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास जि. प. माध्य. शिक्षणाधिकारी किरण लोहार यांनी व्यक्त केला. ते मुदाळ (ता. भुदरगड) येथील प. बा. पाटील संकुलातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या व मार्गदर्शक शिक्षकांच्या सत्कार समारंभाप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी संकुलाचे अध्यक्ष माजी आमदार के. पी. पाटील होते, तर गटशिक्षण अधिकारी रवींद्र चौगले, केंद्रप्रमुख संजय कुकडे, खजानीस रणजितसिंह पाटील, उपाध्यक्ष एस. एस. पाटील, सचिव विकास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वागत व प्रास्ताविक सहा. शिक्षक एस. एम. पाटील यांनी केले. यावेळी सई पाटील, स्वाती खाडे, मैथिली भारमल, देवराज शिंदे, अपूर्वा भिऊंगडे आणि इयत्ता पाचवीमधील अनुष्का पाटील, ऋतुजा गोते यासह सर्व शिष्यवृत्तीधारकांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शिक्षणतज्ज्ञ एच. डी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. संकुलाचे माजी उपाध्यक्ष डी. टी. पाटील, पं. स. सदस्य संग्रामसिंह देसाई, एम. एस. पाटील, मुख्याध्यापक एस. एम. पाटील, एस. व्ही. रणदिवे, आदी उपस्थित होते.

मुदाळ : येथील प. बा. पाटील शिक्षण संकुलातील यशस्वी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांसमवेत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष के. पी. पाटील, उपाध्यक्ष एस. एस. पाटील, शिक्षणाधिकारी किरण लोहार, मुख्याध्यापक एस. एम. पाटील आदी.

**श्री.परशराम बाळाजी पाटील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय मुदाळ या शाळेच्या एन.एन.एम.एस. परीक्षेतील यशाच्या बातमीचे कात्रण**

मार्गदर्शक शिक्षक ः–

शाळेतील ८ शिक्षक एन.एम.एम.एस. या परीक्षेसाठी मार्गदर्शन केले. यातील श्री.रेडेकर टी.एम.यांची एन.एम.एम.एस.विभागप्रमुख पदी नियुक्ती केली.

**अध्यापन नियोजन ः–**

दररोज सकाळी ९ ते ११ व सायंकाळी ४ ते ५.३0 वाजेपर्यत जादा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले. रविवार व सुट्टीच्या दिवशी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यत अभ्यासिका आयोजित करण्यात आली.

एन.एम.एम.एस.परीक्षा विभागप्रमुखानी प्रत्येक शिक्षकाकडून आठवडयाला आढावा घेतला व मुख्याध्यापकांनी एन.एम.एम.एस.विभागप्रमुखाकडून व मासिक सभेला प्रत्येक शिक्षकाकडून एन.एम.एम.एस. संदर्भात आढावा घेतला.

**कोविड १९ कालावधित अध्यापन नियोजन ः–**

सोमवार ते शनिवार सकाळी ८ ते १0.३0 व सायंकाळी ७ ते ८ या कालावधीत ऑनलाईन अध्यापन केले.मुख्याध्यापकांनी ब–याच वेळा शिक्षकांचे ऑनलाईन अध्यापनाचे निरिक्षण केले. विभागप्रमुखाकडून आढावा घेतला. मोबाईल संपर्काव्दारे पालकांशी संपर्क साधून अध्यापनाबाबत खातरजमा केली.

**शैक्षणिक साधने ः–**

टी.व्ही, यु ट्युब वरील व्हीडीओ या साधनांचा वापर केला.

**सराव परीक्षा ः–**

प्रत्येक घटकावर आधारित घटक चाचण्या व अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर वेगवेगळया प्रकाशनाच्या सराव परीक्षा आयोजित केल्या. त्याचे स्वतंत्र वेळापत्रक तयार केले.मुख्याध्यापकांनी एन.एम.एम.एस.ला अध्यापन करणारे शिक्षक व एन.एम.एम.एस. विभागप्रमुखांशी चर्चा करून सराव परीक्षेचे नियोजन केले व झालेल्या परीक्षांच्या निकालांच्या माध्यमातून आढावा घेतला.

**कोविड १९ च्या कालावधित एन.एम.एम.एस. सराव परीक्षा आयोजन ः-**

कोविड कालावधित ऑनलाईन टेस्ट सोडवून घेतल्या. ऑनलाईन सुविधा नाहीत त्या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका घरी पाठवून पालकांना सोडवून घेण्यास सांगितले व त्या शाळेमध्ये गोळा करून तपासून दिल्या.

मुख्याध्यापकानी ऑनलाईन पालक मिटींगच्याव्दारे सराव परीक्षांचा आढावा घेतला.

**विद्यार्थी गुणवत्ता विकासामध्ये पालकांचे योगदान ः-**

मुख्याध्यापकानी सुरवातीला पालक मेळावा घेतला व पालकांना परीक्षेचे महत्व पटवून दिले. तसेच पालकांच्या संमतीने अध्यापनाचे व अभ्यासिकेचे वेळापत्रक तयार करून त्याची अमलबजावणी केली.

**कोविड १९ च्या कालावधित विद्यार्थी गुणवत्ता विकासामध्ये पालकांचे योगदान ः-**

कोविड १९ च्या कालावधीत पालकांची ऑनलाईन सभा घेऊन त्यांना एन.एम.एम.एस.परीक्षेच्या अनुषंगाने माहीती दिली. एन.एम.एम.एस.संदर्भातील वेगवेगळया तज्ञांच्या वेबिनारच्या लिंक व्हॉटसअप ग्रुपवर पाठवून देऊन त्याला विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले.

एन.एम.एम.एस. विभागप्रमुख व मुख्याध्यापकांनी आठवडयातून एकदा पालकांच्याकडून ऑनलाईन आढावा घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांची कोविड कालावधित शिक्षणाची गती कमी झाली नाही.

**एन.एम.एम.एस. परीक्षा गुणवत्ता वाढीचे इतर विशेष प्रयत्न ः-**

१) तज्ञ मार्गदर्शक शिक्षकांच्या कार्यशाळा आयोजित केल्या.

२) विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा मित्रा हा उपक्रम घेऊन विपश्यना ही क्रिया करून घेतली.

३) विविध प्रकाशनांच्या उपलब्ध प्रश्नपत्रिकांचा जादा सराव करून घेतला.

## यशोगाथा

## किसनराव मोरे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज सरवडे

### ता.राधानगरी, जि. कोल्हापूर.

### श्री.प्रकाश शामराव पाटील

किसनराव मोरे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज सरवडे ता.राधानगरी, जि.कोल्हापूर ही शाळा जून १९८६ मध्ये सुरू झाली. श्री.प्रकाश शामराव पाटील हे दि.१ जानेवारी २०२१ पासून या शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्य रत आहेत. त्यांच्या अगोदर श्री.वरूटे एस.टी.हे मुख्याध्यापक म्हणून काम पहात होते. श्री.वरूटे सरांच्या नेतृत्वाखाली शाळेने सर्वच क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केली आहे.श्री.वरूटे सरांच्या सेवानिवृती नंतर त्यांची कार्य संस्कृती श्री.पाटील पी.एस. यानी पुढे चालू ठेवली. सर्व क्रिडास्पर्धा आणि विविध स्पर्धा परीक्षामध्ये शाळेने उल्लेखनिय कामगिरी केली आहे. विविध स्पर्धा परीक्षापैकी एन.एम.एम.एस.परीक्षेत या शाळेचे यश हे फार उल्लेखनिय आहे.आजपर्यंत २३६ विद्यार्थी एन.एम.एम.एस.परीक्षा शिष्यवृतीधारक झाले आहेत.

शाळेच्या एन.एम.एम.एस.परीक्षेतील ३ वर्षाचे यश :-

| शैक्षणिक वर्ष | पट संख्या | एन.एम.एम.एस. परीक्षेस प्रविष्ठ संख्या | उतीर्ण संख्या | उतीर्णतेची टक्केवारी | एन.एम.एम.एस. शिष्यवृती धारक संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २०१८/१९ | १३१ | १०० | ९० | ९०.०० | ४४ |
| २०१९/२० | १२८ | ११३ | १०४ | ९२.३० | ३३ |
| २०२०/२१ | १३५ | १२१ | १०३ | ८५.८३ | २५ |




एन.एम.एम.एस.परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी, शाळेचे संचालक मंडळ व स्टाफ



सारथी पुणे या संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री.अशोक काकडे(IAS), शाळेचे संस्थापक, मुख्याध्यापक, व स्टाफ

मार्गदर्शक शिक्षक :-

शाळेतील ४ शिक्षक एन.एम.एम.एस. या परीक्षेसाठी मार्गदर्शन केले. यातील श्री.बुजरे बी.जी. यांची एन.एम.एम.एस.विभागप्रमुख पदी नियुक्ती केली.

**अध्यापन नियोजन ः–**

इयत्ता ७ वी ची व्दितीय सत्र परीक्षा झाल्यानंतर एप्रिल महिन्यातील उर्वरीत दिवस व मे महिन्याच्या ऊन्हाळी सुट्टीच्या कालावधित दररोज घडयाळी ४ तासाचे अध्यापन केले. जून महिन्यापासून दररोज सकाळी १0 ते ११.३0 व सायंकाळी ५.१0 ते ६.१५ वाजेपर्यंत जादा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले. दिपावली सुट्टीत सणाचे दिवस सोडून प्रत्येक दिवशी दररोज ११.00 ते ५.00 वाजेपर्यंत तसेच नोहेंबर ते परीक्षा अखेर दररोज सकाळी १0.00 ते सायंकाळी 0८.00 वाजेपर्यंत मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले.

एन.एम.एम.एस.विभागप्रमुख व मुख्याध्यापकांनी सतत अध्यापन कार्याचा आढावा घेतला.

**कोविड १९ कालावधित अध्यापन नियोजन ः–**

इयत्ता ८ वी च्या वर्गातील एन.एम.एम.एस.परीक्षा विद्यार्थ्यांचा व्हॉटसॲप ग्रुप तयार केला. कोविड १९ साथीच्या कालावधित शिक्षकांना आठवडयातील दिवस ठरवून दिले. त्यानुसार गुगल मिट व झुम या ऑनलाईन ॲपचा वापर करून दररोज सकाळी 0८.00 ते १0.00 व सायंकाळी 0४.00 ते 0६.00 या वेळेत अध्यापन केले.

मुख्याध्यापकांनी वरचेवर शिक्षकांचे ऑनलाईन अध्यापनाचे निरिक्षण केले. विभागप्रमुखाकडून आढावा घेतला. मोबाईल संपर्काव्दारे पालकांशी संपर्क साधून अध्यापनाबावत खातरजमा केली.

**वापरलेली शैक्षणिक साधने ः–**

विषय अध्यापनामध्ये नेहमीप्रमाणे वर्ग अध्यापनात वापरली जाणारी शैक्षणिक साधने यावरोबरच टि.व्ही., संगणक, मोबाईल तसेच गुगल मिट व झुम या ऑनलाईन ॲपचा वापर करण्यात आला.

**सराव परीक्षा ः–**

ऑक्टोंबर ते डिसेंबर या तीन महिन्याच्या कालावधित दररोज दोन सराव पेपरचे आयोजन करण्यात आले. याकरीता अक्षरगंगा, स्कॉलर, कोल्हापूर जिल्हा मुख्याध्यापक संघ प्रश्नसंच तसेच सार्थक या प्रश्नपत्रिका संचांचा वापर करण्यात आला. एकूण दोन्ही पेपरच्या प्रत्येकी १00 या प्रमाणे २00 सराव प्रश्नपत्रिका घेण्यात आल्या. या सराव प्रश्नपत्रिका तपासून विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. या सराव पेपरमध्ये येणा–या शंका व अडचणी निरसन करण्यासाठी विद्यार्थ्यांचे गट तयार करण्यात येऊन त्यात चर्चा घडवून आणल्या. विद्यार्थ्यांना न सुटणारे प्रश्न एकत्रित करून ते प्रश्न शिक्षकामार्फत सोडवून देण्यात आले.

मुख्याध्यापकानी एन.एम.एम.एस.ला अध्यापन करणारे शिक्षक व एन.एम.एम.एस. विभागप्रमुख यांच्याशी चर्चा करून सराव परीक्षेचे नियोजन केले व झालेल्या परीक्षांच्या निकालांच्या माध्यमातून आढावा घेतला.

**कोविड १९ च्या कालावधित एन.एम.एम.एस. सराव परीक्षा आयोजन ः–**

विद्यार्थ्यांना ठराविक वेळेत शाळेत बोलावून कोविड बाबतच्या सर्व दक्षता घेऊन प्रत्येक दिवशी एक सराव प्रश्नपत्रिका सोडवून घेतली.मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन पालक मिटींगच्याव्दारे सराव परीक्षांचा आढावा घेतला.

**विद्यार्थी गुणवत्ता विकासामध्ये पालकांचे योगदान ः-**

कोविड १९ मुळे सार्वजनिक वाहतुक व्यवस्था बंद असल्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांना दररोज सकाळी वेळेत शाळेत आणून सोडले व सर्वतोपरी सहकार्य केले. इयत्ता ८ वीच्या वर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे पालक शिक्षक आहेत त्यानी विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना येणा-या अडचणी पालकांनी समजून घेऊन त्या शिक्षकांच्या मदतीने सोडवण्यास मदत केली. अशाप्रकारे विद्यार्थी गुणवत्ता विकासामध्ये पालकांचे योगदान घेतले.

**कोविड १९ च्या कालावधित विद्यार्थी गुणवत्ता विकासामध्ये पालकांचे योगदान ः-**

ऑनलाईन शिक्षणासाठी मुलांना मोबाईल उपलब्ध करून दिले. फोन संपर्क माध्यमाच्याव्दारे शिक्षकांशी संपर्क व्यवस्था प्रस्थापित केली . घरच्या स्तरावर पाल्याला येणा-या अडचणी मोबाईल व्दारे पालकांनी शिक्षकांशी संपर्क साधून सोडवून घेतल्या असे उपाय करण्यात आले.एन.एम.एम.एस. विभाग प्रमुख व मुख्याध्यापक आठवडयातून एकदा पालकांकडून ऑनलाईन आढावा घेतला.

**एन.एम.एम.एस. परीक्षा गुणवत्ता वाढीचे इतर विशेष प्रयत्न ः-**

१) विद्यार्थ्यांचे रिपोर्ट कार्ड तयार केले. सदर रिपोर्ट कार्डच्या आधारे विद्यार्थी व पालकांशी संवाद घडवून आणला.

२) कमी गुण मिळणा-या विषयातील जो आशय समजला नाही त्याचे पुनर अध्यापन केले.

३) इतर शाळेतील तज्ञ मार्गदर्शक शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आयोजन केले.

**यशोगाथा**

**शिवराज विद्यालय (ज्युनिअर कॉलेज) मुरगूड**

**ता.कागल , जि. कोल्हापूर.**

**श्री.बाबासो रामचंद्र बुगड**


शिवराज विद्यालय (ज्युनिअर कॉलेज) मुरगूड ता.कागल , जि. कोल्हापूर ही शाळा जून १९९१ मध्ये सुरू झाली. श्री.बाबासो रामचंद्र बुगडे हे दि.०१/०६/२०१८ पासून या शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. श्री.बाबासो रामचंद्र बुगडे यांच्या नेतृत्वा खाली शाळेने सर्वच क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केली आहे. शाळेने समृध्द ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा कुतुहलाचे उगमस्थान या सारख्या विविध उपक्रमा बरोबरच विविध क्रिडा स्पर्धा व विविध बौध्दिक स्पर्धा परीक्षामध्ये शाळेने उल्लेखनिय कामगिरी केली आहे. या विविध स्पर्धा परीक्षापैकी एन.एम.एम.एस.परीक्षेतील या शाळेचे यश फार उल्लेखनिय आहे. आजपर्यंत शाळेचे २३३ विद्यार्थी एन.एम.एम.एस.परीक्षेत शिष्यवृतीधारक झाले आहे.

शाळेच्या एन.एम.एम.एस.परीक्षेतील ३ वर्षाचे यश

| शैक्षणिक वर्ष | पट संख्या | एन.एम.एम.एस. परीक्षेस प्रविष्ठ संख्या | उतीर्ण संख्या | उतीर्णतेची टक्केवारी | एन.एम.एम.एस. शिष्यवृती धारक संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २०१८/१९ | १५६ | ८९ | ८९ | १०० | २६ |
| २०१९/२० | १५१ | ९० | ७३ | ८१.११ | २६ |
| २०२०/२१ | १४० | ७४ | ७४ | ९०.२४ | २३ |




एन.एम.एम.एस.परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे डिजीटल फोटो



सारथी पुणे या संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री.अशोक काकडे(IAS) शाळेच्या एन.एम.एम.एस.विभाग प्रमुखाशी चर्चा करताना.



दै. तरुण भारत 16 मार्च 2017

# मुरगूडच्या शिवराज हायस्कूलचे एनएमएमएस परीक्षेत यश

**१२ लाख रुपयांच्या शिष्यवृत्तीस पात्र ; ४ वर्षात १३१ विद्यार्थ्यांनी मिळवली ३१ लाख ४४ हजार रुपयांची शिष्यवृत्ती**

वार्ताहर
मुरगूड

येथील जय शिवराय एज्युकेशन सोसायटी संचलित शिवराज हायस्कूलचे तब्बल ५० विद्यार्थी एनएमएमएसच्या परीक्षेमध्ये शिष्यवृत्तीस पात्र ठरले. कागल तालुक्यात ही संख्या सर्वाधिक ठरली असून एनएमएमएस परीक्षेतील यशाचे हमखास गणित जमलेल्या 'शिवराज'ने या परीक्षेतील घवघवीत यशाची परंपरा कायम राखली. यशस्वी विद्यार्थ्यांना १२ लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार असून गेल्या चार वर्षामध्ये शाळेतील १३१ विद्यार्थ्यांना ३१ लाख ४४ हजार रुपयांचा लाभ मिळाला आहे. संस्थेचे सेक्रेटरी प्रा. संजय मंडलिक यांनी शाळेच्या या यशाबद्दल विशेष कौतुक केले आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद पुणे यांच्यावतीने अर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी एनएमएमएस परीक्षा दरवर्षी घेण्यात येते. शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी भरीव आर्थिक निधी मिळतो. या परीक्षेतील शिष्यवृत्तीस पात्र शिवराजचे विद्यार्थी पुढीलप्रमाणे : राजेंद्र करडे, प्राजक्ता गुरव, साहिल चौगले, दिपाली कांबळे, प्रतिक मांगले, विराज एकल, सौरभ करडे, तृप्ती चौगले, पृथ्वीराज येरुडकर, अजय कांबळे, वैष्णवी शिंदे, समर्थ शिंदे, अंकिता ढेरे, अर्पिता शिंदे, महेश मोरबाळे, संस्कृती शिंगारे, पृथ्वीराज मिसाळ, अनिकेत पाटील, शिवानी प्रभावळे, सानिका मोंगोरे, संध्या हंचनाळे, पायल पाटील, शुभांगी पोवार, सानिका माने, अदित्य पाटील, प्रथमेश सुतार, मानसी शिंदे, शिवराज प्रभावळे, सुजाता थोरवत, देवराज पाटील, रोशन कांबळे, विशाल प्रभावळे, साक्षी लोकरे, अदित्य हळदकर, पल्लवी सुतार, नेहा कुंभार, अनुराधा बरकाळे, प्रियांका पाटील, प्रतिक्षा पाटील, पद्मभूषण कांबळे, सायली चौगले, पायल सुतार, साक्षी कांबळे, हर्षदा कुदळे, स्वाती पाटील, अमित पाटील, अदित्य फासके, दिगंबर पाटील आणि तन्मय रामसे. या विद्यार्थ्यांना पी. डी. रणदिवे, अविनाश चौगले, रविंद्र जालिमसर, शशिकांत सुतार या शिक्षकांचे मार्गदर्शन तर संस्थेचे सेक्रेटरी प्रा. संजय मंडलिक, अध्यक्ष गजाननराव गंगापूरे, सदस्य विरेंद्र मंडलिक, आण्णासो थोरवत, प्राचार्य महादेव कानकेकर, बी. आर. बुगडे, सुनिल मंडलिक यांचे प्रोत्साहन मिळाले.

मुरगूड :एनएमएमएस परीक्षेत शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या शिवराज हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शक प्राचार्य महादेव कानकेकर, उपमुख्याध्यापक बी. आर. बुगडे, शिक्षक आणि विद्यार्थी.

शिवराज विद्यालय (ज्युनिअर कॉलेज) मुरगूड या शाळेच्या एन.एन.एम.एस. परीक्षेतील यश दर्शविणारी वर्तमानपत्रातील बातमी

**मार्गदर्शक शिक्षक ः-**

शाळेतील ५ शिक्षकांनी एन.एम.एम.एस.या परीक्षेसाठी मार्गदर्शन केले. श्री.रणदिवे पी.डी. यांनी एन.एम.एम.एस.विभागप्रमुख म्हणून काम केले.

**अध्यापन नियोजन ः-**

उन्हाळी सुट्टीमध्ये तसेच शाळा सुरू झाले नंतर दररोज सकाळी ०७.०० ते ०९.०० या कालावधित एन.एम.एम.एस. च्या विविध विषयांचे वेळापत्रक तयार करून त्याप्रमाणे अध्यापन केले. शालेय कामकाजा व्यतिरिक्त सुट्टीच्या दिवशी सकाळच्या सत्रात जादा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले.

एन.एम.एम.एस.परीक्षा विभागप्रमुखांनी प्रत्येक शिक्षकाकडून आठवडयाला आढावा घेतला व मुख्याध्यापकांनी एन.एम.एम.एस.विभागप्रमुखाकडून आढावा घेतला तसेच मासिक सभेला प्रत्येक शिक्षकाकडून एन.एम.एम.एस.संदर्भात आढावा घेतला.

**कोविड १९ च्या कालावधित अध्यापन नियोजन ः-**

कोविड १९ च्या कालावधित सकाळी ०७.०० ते ०९.०० या कालावधित गणित, विज्ञान, समाजशास्त्र या विषयाचे वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाईन अध्यापन केले व दुपारी ११.०० ते ०२.०० या कालावधित GMAT या विषयाचे ऑनलाईन अध्यापन करण्यात आले.

मुख्याध्यापकांनी वरचेवर शिक्षकांचे ऑनलाईन अध्यापनाचे निरिक्षण केले. विभागप्रमुखाकडून आढावा घेतला. मोबाईल संपर्काव्दारे पालकांशी संपर्क साधून अध्यापनाबावत खातरजमा केली.

**वापरलेली शैक्षणिक साधने ः-**

इयत्ता ७ वी व ८ वी ची पाठयपुस्तके, तक्ते तसेच टि.व्ही., संगणक , मोबाईल तसेच गुगल मिट व झुम या ऑनलाईन ॲपचा वापर करण्यात आला.

**सराव परीक्षा ः-**

अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर दररोज सकाळच्या सत्रात या कालावधित पर्यवेक्षित अभ्यासिका व दुपारच्या सत्रात दोन पेपर सोडवून घेतले. सदरचे पेपर तपासून त्या बाबतचे शंकासमाधान सबंधित विषय शिक्षकाकडून केले गेले.

**कोविड १९ च्या कालावधित एन.एम.एम.एस. सराव परीक्षा आयोजन ः-**

एक दिवस ऑनलाईन व एक दिवस ऑफलाईन या पध्दतीने विद्यार्थ्यांच्या सराव परीक्षा घेतल्या. ऑफलाईनच्या दिवशी विद्यार्थ्यांना ठराविक वेळेत शाळेत बोलावून कोविड बाबतच्या सर्व दक्षता घेऊन प्रत्येक दिवशी एक सराव प्रश्नपत्रिका सोडवून घेतली.

मुख्याध्यापकांनी ऑनलाईन पालक मिटींगच्याव्दारे सराव परीक्षांचा आढावा घेतला.

**विद्यार्थी गुणवत्ता विकासामध्ये पालकांचे योगदान ः-**

एन.एम.एम.एस. परीक्षा आवेदनपत्र भरणेपूर्वी पालक सभा घेऊन परीक्षेची सर्व माहिती पालकांना दिली व आवेदन पत्र भरण्यासाठी आवश्यक कागद पत्रांची पूर्तता पालकांकडून करून घेतली.

एन.एम.एम.एस.परीक्षेला प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांचे बहूतांश पालक हे ग्रामिण भागातील असल्यामुळे परीक्षा आवेदन पत्र भरण्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेखेरीज विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासामध्ये पालकांचे फारसे योगदान नाही.

**कोविड १९ च्या कालावधित विद्यार्थी गुणवत्ता विकासामध्ये पालकांचे योगदान ः–**

ऑनलाईन शिक्षणासाठी पालकांनी मुलांना मोबाईल उपलब्ध करून दिले. कोविड १९ च्या कालावधित मुलांची सुरक्षित शाळेत ने–आण करणे तसेच मास्क, सॅनिटायझर इत्यादी बाबींची सुविधा उपलब्ध करून देणे याबाबत पालकांनी सहकार्य केले.

एन.एम.एम.एस.विभागप्रमुख व मुख्याध्यापक आठवडयातून एकदा पालकांच्याकडून ऑनलाइन आढावा घेतला.

**एन.एम.एम.एस. परीक्षा गुणवत्ता वाढीचे इतर विशेष प्रयत्न ः–**

१) जास्तीतजास्त सराव परीक्षा घेतल्या.

२) इतर शाळेतील तज्ञ मार्गदर्शक शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आयोजन केले.

**चिंतनात्मक प्रश्न ः–**

१. एन.एन.एम.एस.परीक्षा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यामध्ये यशोगाथेतील मुख्याध्यापकांना कोणत्या अडचणी आल्या ?
२. सदर समस्या सोडविण्यासाठी या मुख्याध्यापकांनी कोणकोणत्या नेतृत्व कौशल्याचा वापर केला ?

**विचार करूया चर्चा करूया ः–**

एन.एन.एम.एस.परीक्षेत उज्वल यश मिळण्यासाठी खालील प्रसंगी मुख्याध्यापक म्हणून आपण कसा विचार कराल? याचे एक उदाहरण खाली विचारार्थ दिले आहे.

- ग्रामिण भागातील एका खेडयात एक माध्यमिक शाळा आहे.या शाळेची पटसंख्या २३० असून बहूतांश विद्यार्थी आर्थिकदृष्टया मागासलेल्या गटातील आहेत. शाळेच्या सुरुवातीपासून आजपर्यंत या शाळेतील एकही विद्यार्थी एन.एन.एम.एस.परीक्षेत प्रविष्ठ झालेला नाही. येथील शिक्षकामध्ये कार्यसंस्कृती रूजलेली नसून एन.एन.एम.एस.परीक्षेच्या अनुषंगाने त्यानी शाळेमध्ये अजिबात प्रयत्न केलेले नाहीत. तेथील विद्यार्थी शिस्तप्रिय असून शिक्षकांचा आदर करणारे आहेत. पण त्या विद्यार्थ्यांना एन.एन.एम.एस.परीक्षेबाबत काहीही माहिती नाही. अशा शाळेत आपण बदलीने रूजू झाल्यास या शाळेतील विद्यार्थ्यांचे एन.एन.एम.एस. परीक्षेमध्ये उज्वल यश मिळविण्यासाठी आपला कृती आराखडा सुरवातीपासून कसा असेल या बाबत केवळ मुद्दे निहाय लेखन करा.

## एन.एन.एम.एस.परीक्षेमध्ये यश मिळविण्यासाठी शालेय नेतृत्वाला असेही करता येईल

ग्रामिण भागातील प्राथमिक व माध्यमिक शाळामधील बहूतांश विद्यार्थी हे आर्थिकदृष्टया मागासलेल्या गटातील असतात. या गटातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्याना सर्वोत्तम शिक्षण देण्याच्या दृष्टीने आर्थिक सहकार्य करणे तसेच या विद्यार्थ्यांचे उच्च माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण घेण्यास मदत करणे व आर्थिक दुर्बलतेमुळे या विद्यार्थ्यांची उच्च माध्यमिक स्तरापर्यंत होणारी गळती रोखणे या करीता केंद्रशासनाच्या वतीने एन.एन.एम.एस.या परीक्षेचे आयोजन केले जाते.

एन.एन.एम.एस.परीक्षेमध्ये अधिकाधिक विद्यार्थी गुणवत्ताधारक होण्यासाठी शालेय मुख्याध्यापकाना खालील कृती कार्यक्रमाची आखणी व त्याची प्रभावी अंमलबजावणी करता येईल.

- **शिक्षक सभा**

  शिक्षक सभा घेऊन एन.एन.एम.एस.परीक्षेची त्याना सविस्तर माहिती देऊन या परीक्षेत विद्यार्थी गुणवत्ताधारक करणे हा शाळेच्या गुणवत्तेचा एक पैलू आहे याची जाणीव करून देणे. या परीक्षेच्या अनुषंगाने चाकोरी बाहेर जाऊन शाळेला अतिरिक्त समयदान करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन करणे शिक्षकांच्या मतांचा आदर करून या परीक्षेसाठी विद्यार्थी मार्गदर्शनाचा एक कृती आराखडा तयार करणे. त्यातील एका शिक्षकावर एन.एन.एम.एस.परीक्षा विभागप्रमुखांची जबाबदारी देणे इत्यादी बाबींचे नियोजन करणे.

- **पालक सभा व पालक प्रबोधन**

  इ.७ वी वार्षिक परीक्षा झालेनंतर शाळेत विद्यार्थी, पालक व शिक्षक यांची संयुक्त सभा बोलावून विद्यार्थी व पालक यांना एन.एन.एम.एस.परीक्षेची सविस्तर माहिती देऊन त्याचे महत्व पटवून देणे. सदर सभेमध्ये एन.एन.एम.एस.परीक्षा मार्गदर्शन कृतीआराखडा मांडून त्या संदर्भात विद्यार्थी व पालक यांची मते घेऊन त्या कृतीआराखडयाला अंतिम रूप देणे

  आपल्या पाल्याबाबत सुजाण पालकत्वाची भूमिका प्रभाविपणे कशी पार पाडावी? आपल्या पाल्याला दर्जेदार वेळ कसा दयावा? पाल्याशी सकारात्मक संवाद साधून त्यांना अभ्यासाच्या चांगल्या सवयी लावण्यासाठी कसे प्रेरीत करावे? पाल्यांना घरी कोणत्या सुविधा उपलब्ध करून दयाव्या? शाळेच्या संपर्कात राहून पाल्याच्या प्रगतीसाठी कसे योगदान दयावे? पाल्याशी सकारात्मक संवाद कसा करावा? इत्यादी सर्व बाबीशी संबधीत शाळेमार्फत पालकाना प्रबोधित करण्यात यावे. पालक प्रबोधनाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीमध्ये निश्चित फायदा होतो.

- **एन.एन.एम.एस.परीक्षा मार्गदर्शन कृती आराखडा**

| कालावधी | वेळ |
|---|---|
| दिर्घसुट्टी कालावधी | सकाळी ०७.३० ते ११.३० विषय निहाय वेळापत्रकाप्रमाणे मार्गदर्शन |
| प्रत्यक्ष शाळा सुरू कालावधी | सकाळी १०.०० ते ११.०० विषय निहाय वेळापत्रकाप्रमाणे मार्गदर्शन |
| रविवार व इतर सुट्टीचा कालावधी | सकाळी ०७.३० ते ११.३० विषय निहाय वेळापत्रकाप्रमाणे मार्गदर्शन |

- वेळापत्रक
- प्रत्येक आठवडयाला प्रत्येक घटक झाल्यानंतर त्यावर आधारित वस्तूनिष्ठ सराव परीक्षा नियोजन
- प्रत्येक तासिकेला शेवटी ५ मिनिटे शंका समाधान.
- सप्टेंबर अखेर एन.एन.एम.एस.परीक्षा अभ्यासक्रम पूर्ण करणे.
- ऑक्टोंबर व नोहेंबर मध्ये दररोज संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित पेपर– १ व २ च्या किमान ५० सराव परीक्षांचे आयोजन.परीक्षांचे निकाल तावडतोब दुस–या दिवशी देऊन त्या संदर्भातील आवश्यक पुढील मार्ग दर्शन.
- इतर शाळातील तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन
- सर्व घटक चाचण्या व संपूर्ण अभ्यासक्रमावरील सराव परीक्षा यांचे लेखी रेकॉर्ड.
- लेखी रेकॉर्डच्या आधारे विद्यार्थी पालक संवाद व मार्गदर्शन.

**४) कृती आराखडयाच्या प्रभावी अम्मलबजावणी मध्ये मुख्याध्यापकांची भूमिका**

- मार्गदर्शक शिक्षकापैकी आवड व क्षमता यांचा विचार करून एका शिक्षकाची एन.एन.एम.एस. परीक्षा विभागप्रमुख पदी निवड करावी.
- एन.एन.एम.एस. विभागप्रमुखाकडून वारंवार आढावा घ्यावा.
- अधून–मधून मार्गदर्शन वर्गाला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधून प्रत्यक्ष कार्याचा आढावा घ्यावा.
- मासिक सभेमध्ये त्या महिन्यात अपेक्षित कार्याचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार सुधारणा व मार्गदर्शन करावे.
- ठराविक अंतराने पालक सभा घेऊन त्याना विद्यार्थ्यांची प्रगती अवगत करून दयावी व पुढील कालावधीसाठी मार्गदर्शन करावे.
- नियोजित कृती आराखडयानुसार सर्व बाबी पार पडतील याची खातरजमा करावी.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने प्रज्ञावान विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या संदर्भात केलेला विचार.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा आढावा घेतला असता प्रज्ञावान विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या संदर्भात केलेला विचार खालीलप्रमाणे आहे.

१. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये कांही अंगभूत प्रतिभा असतात. त्या शोधल्या पाहिजेत,त्यांचे संगापन केले पाहिजे,त्यांना उत्तेजन दिले पाहिजे आणि त्या विकसित केल्या पाहिजेत. विविध रूची, कल किंवा

क्षमतांच्या रूपात या प्रतिभांची अभिव्यक्ती होऊ शकते. जे विद्यार्थी एखादया क्षेत्रात विशेष रूची आणि क्षमता दर्शवितात, त्यांना सामान्य शालेय अभ्यासक्रमाच्या पलिकडेदेखील या क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. शिक्षकांच्या शिक्षणामध्ये अशा विद्यार्थ्यांच्या प्रतिभा आणि आवडी ओळखण्याच्या आणि त्याना उत्तेजन देण्याच्या पध्दतींचा समावेश असेल NCERT आणि NCTE कुशाग्र बुध्दीच्या मुलांच्या शिक्षणासाठी मार्गदर्शक तत्वे विकसित करेल. B.Ed. कार्यक्रम देखील विशेष प्रतिभा संपन्न मुलांच्या शिक्षणात विशेषज्ञता प्राप्त करण्यासाठी परवानगी देऊ शकतात.

२. वर्गातील एकाच विषयात विशेष रूची आणि / किंवा प्रतिभा असलेल्या विद्यार्थ्यांना पूरक संवर्धन साहित्य आणि मार्गदर्शन आणि प्रेरणा देऊन प्रोत्साहित करणे हे शिक्षकाचे लक्ष असेल. विषय – केंद्रित आणि प्रकल्प आधारीत क्लब आणि मंडळाना शाळा, शाळा संकुल जिल्हा पातळीवर आणि त्याही पलिकडे प्रोत्साहन आणि सहाय्य केले जाईल. उदाहरणार्थ विज्ञान मंडळे, गणित मंडळे, संगित आणि नृत्य कला मंडळे, बुध्दीबळ मंडळे, कविता मंडळे, भाषा मंडळे, नाटक मंडळे, वादविवाद मंडळे, क्रिडा मंडळे, इको–क्लब, आरोग्य व स्वास्थ्य क्लब / योगा क्लब इत्यादी अनेक या धर्तीवर, माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्या साठी विविध विषयांच्या उच्च-गुणवत्तेच्या राष्ट्रीय निवासी उन्हाळी कार्यक्रमांनाही प्रोत्साहन दिले जाईल. ज्यात सामाजिक–आर्थिकदृष्टया वंचीत गटासह देशातील उत्कृष्ठ विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना आकर्षित करण्यासाठी कठोर गुणवत्ता–आधारीत परंतू न्याय प्रवेश प्रक्रिया असेल.

३. देशभरात विविध विषयामधील ऑलिम्पियाड आणि स्पर्धा घेण्यात येतील, ज्यामध्ये व्यवस्थित समन्वयाने शाळा ते स्थानिक ते राज्य ते देश पातळी अशी प्रगती होईल. जेणेकरून सर्व विद्यार्थी जे त्या स्तरासाठी पात्र ठरतील त्यानुसार सहभाग घेऊ शकतील. मोठया प्रमाणावर सहभाग सुनिश्चित करण्यासाठी या स्पर्धा ग्रामिण भागात आणि प्रादेशिक भाषांमध्ये घेण्याचे प्रयत्न केले जातील. IIT आणि NIT सारख्या प्रमुख संस्थासह, सार्वजनिक आणि खाजगी विद्यापीठांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ऑलिंम्पियाडमधील गुणवत्ता–आधारीत निकाल आणि इतर सबंधित राष्ट्रीय कार्यक्रमांचे निकाल, त्यांच्या पदवीपूर्व कार्य क्रमांमध्ये प्रवेषाच्या निकषाचा भाग म्हणून वापरण्यास प्रोत्साहित केले जाईल.

४. एकदा का सर्व घरे किंवा शाळांमध्ये इंटरनेट–कनेक्शनयुक्त स्मार्टफोन किंवा टॅब्लेट उपलब्ध झाले की,पाालक आणि शिक्षकांच्या योग्य देखरेखीखाली विद्यार्थ्यांसाठी गटाचे उपक्रम म्हणून प्रश्नमंजुषा स्पर्धा, मुल्यांकन समृधी साहित्य असलेली ऑनलाईन ॲप आणि समान आवडी असलेल्यासाठी ऑनलाईन कम्यूनिटीज विकसीत केल्या जातील आणि उपरोक्त सर्व उपक्रम अधिक चांगले बनविण्यासाठी प्रयत्न केले जातील करतील. डीजीटल अध्यापन शास्त्र वापरण्यासाठी आणि त्याव्दारे ऑनलाईन संसाधने आणि सहयोगाव्दारे अध्यापन–अध्ययन प्रक्रिया अधिक समृध करण्यासाठी शाळा टप्याटप्याने स्मार्ट क्लासरूम्स विकसित करतील.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये केलेल्या वरील तरतूदी व या मोडयुलमध्ये उल्लेख केलेल्या बाबी यामध्ये ब–याच प्रमाणात साम्य आहे.

## समारोप

शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षामध्ये यश मिळविण्यामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी व समस्या आहेत असे असले तरी एकविसाव्या शतकाची आव्हाणे पेलणारा विद्यार्थी निर्माण करणे व त्याच्या आवडी व क्षमतेनुसार त्यांना विविध शालेय स्पर्धेसाठी तयार करण्याचे सामर्थ्य शाळेच्या मुख्याध्यापकांच्या कल्पक नेतृत्वामध्ये असते. त्यासाठी मुख्याध्यापकांनी स्वंयविकास, संघबांधणी, भागिदारी, शालेय प्रशासन या भूमिका व जबावदा-या समर्थपणे पार पाडाव्या लागतात. आपले विचार व कृती यांच्या माध्यमातून एक आदर्श निर्माण करून शिक्षकांना प्रेरीत करून त्याना कृतीप्रवण बनविले पाहिजे. अध्ययन-अध्यापनाच्या प्रक्रियेतून अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी सहका-याना प्रोत्साहित केले पाहिजे.कोल्हापूर जिल्हयातील एन. एम.एम.एस.परीक्षेमध्ये आपल्या शाळामध्ये उज्चल यश मिळवणा-या श्री पाटील एस.एम., श्री.पाटील पी.एस. व श्री.बुगडे बी. आर. यांच्यासारखे अनेक मुख्याध्यापक व शिक्षक कार्यरत आहेत. यांच्या कार्यापासुन प्रेरणा घेऊन इतर मुख्याध्यापक व शिक्षक यांनी एन. एम.एम.एस.परीक्षेच्या अनुषंगाने नियोजनवध्द पध्दतीने काम करून एन. एम.एम.एस.परीक्षेत उज्चल यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा दयाव्यात व आवश्यक कृती करावी.

## संदर्भ साहित्य


१. मा.आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांची दिनांक ०६/११/२०२१ ची एन. एम.एम.एस.परीक्षा अधिसुचना.
२. गोर्ले शिवराज, सुजाण पालक व्हाव कस ? पुणे ः राजहंस प्रकाशन
३. डॉ.ना.के.उपासनी, डॉ.प्र.ल.गावडे, शाळांचे व्यवस्थापन सिध्दांत आणि व्यवहार. पुणे ः अमेय प्रकाशन
४. संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे.शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम कार्यपुस्तिका
५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२०


## वेबसाईटस् व लिंकस्


१.http://www.mscepune.in

२.http://youtu.be/MnzHDSFgflA

३.http://youtu.be/_sE_on_8Ilk

४.http://youtu.be/P8Ncco-yVbO



**मोड्यूल विकसक**
डॉ. आनंद पाटील,
मुख्याध्यापक
मडिलगे हायस्कूल आणि समर्थ कनिष्ठ महाविद्यालय,मडिलगे बु.
ता.भुदरगड, जि.कोल्हापूर.

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्री.रमाकांत काठमोरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद